सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २३१ | गुरुवार, दि. १४ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## धावत्या वाहनांना लागणारी आग रोखण्यासाठी काय खबरदारी घ्याल ?

### वाढत्या तापमानामुळे वाहनांना आगीचा धोका वाढला; पारा चढत असल्याने काळजी घेणे गरजेचे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यात तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून, वाहनांना आग लागण्याच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. राज्यातील काही भागांत महामार्गासह शहरांमध्ये कार, दुचाकी, ट्रक, बस तसेच ईव्ही वाहनांना आग लागण्याच्या घटना समोर येत आहेत.अनेकदा इंजिनमधील बिघाड, वायरिंग शॉर्टसर्किट, गॅसगळती किंवा अतिउष्णतेमुळे ही दुर्घटना घडते. काही घटनांमध्ये वाहनाची इलेक्ट्रॉनिक सिस्टीम लॉक होत असल्याने वाहनातील प्रवाशांना बाहेर पडण्यास विलंब होऊन जीवितहानीचाही धोका निर्माण होत आहे. त्यामुळे वाहनधारकांनी नियमित देखभाल करणे आणि खबरदारी घेणे अत्यावश्यक असल्याचा सल्ला वाहनतज्ज्ञांकडून दिला जात आहे.

वाहनातून जळका वास येणे, बॉनेटमधून धूर दिसणे, इंजिनचे तापमान अचानक वाढणे, वायरिंग जळल्यासारखा वास येणे, बॅटरी वारंवार डिस्चार्ज होणे किंवा इलेक्ट्रॉनिक सिस्टम अचानक बंद पडणे ही धोक्याची चिन्हे मानली जातात. अशी लक्षणे दिसल्यास वाहन तत्काळ तपासणे आवश्यक आहे.

**वाहनांना आग लागण्याची काय आहेत कारणे ?**

१) वाहनांना आग लागण्यामागे सर्वाधिक कारण शॉर्टसर्किट असल्याचे तज्ज्ञ सांगतात. याशिवाय, बॅटरी ओव्हरहीट होणे, इंधन किंवा गॅसगळती, निकृष्ट दर्जाचे इलेक्ट्रिकल ॲक्सेसरीज बसवणे, इंजिनचे तापमान नियंत्रणाबाहेर जाणे आणि वेळेवर सर्व्हिसिंग न करणे ही प्रमुख कारणे आहेत. ईव्ही वाहनांमध्ये बॅटरी सेल डॅमेज किंवा चार्जिंगदरम्यान झालेली त्रुटीही आगीचे कारण ठरू शकते. उन्हाळ्यात तापमान ४० अंशांच्या पुढे गेल्यावर वाहनांचे इंजिन वेगाने गरम होते.

२) सतत एसीचा वापर, दीर्घकाळ ड्रायव्हिंग आणि अपुरी देखभाल यांमुळे इलेक्ट्रिकल लोड वाढतो. यामुळे वायरिंग वितळणे, बॅटरी ओव्हरहिट होणे आणि टायर प्रेशर वाढून ब्लास्ट होण्याचे प्रकारही घडतात. इंजिन ऑइल कमी असल्यास घर्षण वाढून आग लागण्याचा धोका निर्माण होतो.

वाहनांना आग लागण्याच्या घटना वाढल्या उन्हाळ्यात तापमान वाढल्यामुळे वाहनांचे इंजिन, बॅटरी आणि इलेक्ट्रिकल सिस्टमवर अतिरिक्त ताण येत आहे. अनेक जिल्ह्यात



महामार्गावर लांब पल्ल्याच्या प्रवासात अशा घटना अधिक घडताना दिसतात. जुन्या वाहनांमध्ये वायरिंगची झीज, तर नवीन वाहनांमध्ये इलेक्ट्रॉनिक फॉल्टमुळे आग लागण्याचा धोका वाढला आहे. काही प्रकरणांमध्ये ईव्ही आणि सीएनजी वाहनांमध्येही अचानक आग लागल्याचे प्रकार नोंदवले जात आहेत.

## उन्हाचा कहर; चौघांचा मृत्यू

### तापमानाचा पारा वाढल्याने काळजी घेण्याची आवश्यकता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह तालुक्यातील तापमानात मोठी वाढ झाल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यात तालुक्यातील चार जणांचा उष्णतेच्या लाटेचा फटका बसल्यामुळे मृत्यू झाला. तसेच एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचीही घटना घडली आहे.

याबाबतची माहिती अशी, की तालुक्यातील एकतास येथील विश्वास नारायण पाटील (वय ४४) हे भरदुपारी शेतात काम करून उन्हात घरी परतले. त्यानंतर लागलीच पाणी पिऊन कूलरसमोर बसले असता त्यांना जोरदार झटका आला आणि उलट्या झाल्या. यामुळे उपचारासाठी त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉ. जयेश शिंदे यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. तसेच त्यांचा मृत्यू






हृदयविकाराचा झटका आल्याने झाला असल्याची शक्यताही त्यांनी वर्तविली आहे. स्व. विश्वास पाटील यांच्यामागे भाऊ, पत्नी, दोन मुलगे असा परिवार आहे.

निमगूळ (ता. शिंदखेडा) येथील सिंधुबाई रमेश बागल (वय ६९) या रेल्वेने भाच्याच्या मुलाच्या मेंदी कार्यक्रमासाठी अमळनेर येथे आल्या. याचवेळी सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास 'एलआयसी'चे अधिकारी आर. बी. पाटील हे रेल्वेस्थानकाकडे फिरायला गेले असता सिंधुबाई पाटील बेशुद्धावस्थेत पडलेल्या आढळून आल्या. त्यांना श्वास घेताना जोरदार धाप लागत होती. श्री. पाटील यांनी त्यांना रिक्षातून ग्रामीण रुग्णालयात आणले असता डॉ. आशिष पाटील यांनी तपासणी केली असता त्यांना मृत घोषित केले. सिंधुबाई यांना प्रचंड ताप होता. त्यामुळे त्यांचा मृत्यू उष्णतेमुळे झाला असावा, अशी शक्यता वर्तविण्यात आली. त्यांच्यामागे मुलगा, सून, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

### देवगाव देवळीतील तरुणाची आत्महत्या

दरम्यान, देवगाव देवळी येथील अनिल मंगल शिरसाठ (वय ३५) याने स्वतःच्या राहत्या घरी दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. त्याच्यामागे आई, पत्नी, मुलगा, तीन मुली, असा परिवार आहे. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही.

एलआयसी कॉलनीतील रहिवासी रमेश जगन्नाथ चौधरी हे देखील उन्हात लग्नाला गेल्यानंतर आजारी पडले आणि आजारपणात त्यांचा मृत्यू झाला. तसेच ढेकू येथील शंकर आनंदा पाटील यांचा देखील उष्णतेमुळे मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

## प्रताप स्वायत्त महाविद्यालयात प्रवेश प्रक्रियेला सुरूवात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेश शिक्षण मंडळाचा सुवर्ण महोत्सवी वारसा लाभलेल्या प्रताप महाविद्यालयात (स्वायत्त) यंदासाठी (शैक्षणिक वर्ष २०२६-२७) प्रथम वर्ष कला (इ.अ.), वाणिज्य (बी. कॉम.), विज्ञान (बी.एस्सी.) आणि व्होकेशन (बी. व्होक.) या वर्गांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. ८० वर्षांची देदीप्यमान परंपरा असलेल्या या महाविद्यालयाने नुकतीच नॅक पुनर्मूल्यांकनात 'अ' श्रेणी प्राप्त केली असून, शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

विविध अभ्यासक्रमांची उपलब्धता विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्यासाठी महाविद्यालयात मोठी संधी उपलब्ध आहे. कला शाखा : इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल यांसह मानसशास्त्र आणि संरक्षणशास्त्र यांसारखे विषय उपलब्ध आहेत. वाणिज्य शाखा : आर्थिक व खर्च लेखांकन, बँकिंग, कमॉडिटी मार्केट आणि संगणक कौशल्य यावर विशेष भर दिला आहे. विज्ञान शाखा : भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, मायक्रोबायोलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र यांसारखे आधुनिक विषय आहेत. व्होकेशनल कोर्सेस : फूड प्रोसेसिंग, सोलर रिन्यूएबल एनर्जी आणि अकाऊंटिंग अँड टॅक्सेशन यांसारख्या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रवेशप्रक्रिया ऑफलाईन आणि ऑनलाईन अशा दोन्ही पद्धतीने पार पडणार आहे. अधिक माहितीसाठी- विद्यार्थ्यांनी डॉ. विवेक बडगुजर (९८९०१९७५८१) किंवा डॉ. रामदास सुरळकर (९९६०३६२६५४) यांच्याशी संपर्क साधावा.

## पिकअप व्हॅनमधून बैलांची कोंबून वाहतूक

### पोलिसांकडून मुद्देमाल जप्त; गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पिकअप व्हॅनमधून बैलांची दाटीवाटीने कोंबून वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्याविरुद्ध येथील पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर संबंधित बैलांसह पिकअप व्हॅन असा एकूण चार लाख चाळीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी, की सोमवार, दि. ११ मे रोजी दुपारी तीनच्या सुमारास गलवाडे रस्त्यावरील जे. पी. हॉटेलजवळ तीन वाहनांमधून जनावरांची वाहतूक सुरू असल्याची माहिती काही गोरक्षकांनी पोलिसांना दिली. त्यानंतर संबंधित वाहने अडविण्यातही आली. याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तिन्ही वाहने पोलीस ठाण्यात आणून जमा केली. पोलिसांनी चौकशी केली असता संबंधित जनावरे शेतकऱ्याची असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, गणेश डिगंबर पाटील (रा. शिरसमणी, ता. पारोळा) यांनी त्यांच्या पिकअप व्हॅनमध्ये (एमएच १९- सीवाय ६६९४) चार बैल कोंबून भरल्याचे निदर्शनास आले. वाहतूक पोलीस संजय बोरसे यांच्या फिर्यादीवरून

पान २ वर

## 'एमआरपी' दरातील फसवणूक; ग्राहक पंचायतीतर्फे आंदोलन

### जळगावात निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांना दिले निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ग्राहकांची 'एमआरपी' दरातून होत असलेली कथित फसवणूक होत आहे. सदर प्रकार तत्काळ थांबवावा, या मागणीसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने देशभर आंदोलन सुरू करण्यात आले असून, त्या अंतर्गत जळगाव येथे प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की केंद्र सरकारने वस्तूंवरील कमाल किरकोळ किंमत अर्थात 'एमआरपी' निश्चित करण्यासाठी कठोर व वैज्ञानिक धोरण लागू करावे. उत्पादनखर्चाच्या तुलनेत अनेक कंपन्या ३०० ते ४०० पट अधिक 'एमआरपी' छापत असल्याचा आरोप ग्राहक पंचायतीने केला आहे. तसेच ५० टक्के सूट, एकावर एक मोफत यांसारख्या ऑफर्सद्वारे ग्राहकांची दिशाभूल होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रत्येक उत्पादनावर उत्पादनखर्च छापणे बंधनकारक करावे तसेच त्यावर केवळ २० ते ३० टक्के नफा मर्यादित ठेवावा. यासाठी संसदेत कठोर कायदा मंजूर करून स्वतंत्र नियंत्रण प्राधिकरण स्थापन करण्याची मागणीही



*अमळनेर : जळगाव येथे प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांना निवेदन देताना ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी.*

करण्यात आली आहे.

सदर निवेदन पंतप्रधान, केंद्रीय ग्राहक संरक्षणमंत्री तसेच केंद्रीय वित्त व वाणिज्य मंत्र्यांना अग्रेषित करण्यात आले आहे. यावेळी प्रांत सचिव डॉ. अनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष तायडे, सतीश देशमुख, दिनेश तायडे, जगन्नाथ तळेले, ॲड. शिरीन अमरेलीवाला व मनोज भांडारकर उपस्थित होते. शिष्टमंडळाने जळगाव तालुका तहसील कार्यालयातही निवेदन सादर केले.

## आता सोने घेणे विसराच; एका रात्रीत सोने-चांदीचे दर गगनाला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : केंद्र सरकारने सोन्यावरील आयात शुल्क वाढवल्यानंतर मोठा परिणाम झाला. सोन्यासोबतच चांदीच्या किमतीमध्येही मोठी वाढ झाली. चला तर जाणून घ्या आजचे सोन्याचे भाव.इराण आणि अमेरिका युद्धाला सुरूवात झाल्यापासून सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाली. सतत दरात चढउतार बघायला मिळाले.

२८ फेब्रुवारी २०२६ पूर्वी सोन्याचे दर प्रचंड वाढले होते. २ लाखाच्या आसापास सोने गेले होते. मात्र, जसाही अमेरिकेने इराणवर हल्ला केला तसे सोन्याचे दर घसरले. यादरम्यान याचाच फायदा घेत अनेकांनी सोन्याची जोरदार खरेदी केली. मात्र, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठे आवाहन करत १ वर्षाकरिता सोने खरेदी न करण्याचे जनतेला सांगितले. मात्र, त्यानंतर दोन दिवस सोन्याच्या भावात मोठी घसरण झाली. आज सोने आणि चांदीचे भाव गगणाला पोहोचले आहेत.

सोने ८ हजारांनी तर चांदी तब्बल २० हजारांनी महाग झाली. सराफा बाजारात मोठी खळबळ उडाली. केंद्र सरकाराने सोन्याच्या आयात शुल्कात मोठी वाढ केली. पूर्वी सोन्यावरील आयात शुल्क ६ टक्के होते. आता त्यात वाट करून तब्बल १५ टक्के करण्यात आले.जळगावच्या सराफ सोन्या आणि चांदीच्या



दरात विक्रमी वाढ झाली. सोन्याच्या दरात तब्बल ८ हजार तर चांदीच्या दरात २० हजार रुपयांची वाढ झाली. सोन्याचे दर जीएसटीसह १ लाख ६३ हजार ७७० रुपयांवर गेले. तर चांदीचे दर जीएसटीसह २ लाख ९३ हजार रुपये झाले. ही अत्यंत मोठी वाढ म्हणावी लागेल. एकाच रात्रीत ही मोठी वाढ झाली. काल आणि परवा सोन्याचे भाव कमी होते.आयात शुल्कात वाढ केल्याने परिणामी सोने आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली. सकाळी सोन्याचे दर तब्बल १४ हजारांनी महाग झाले होते, मात्र दोन तासात पुन्हा घसरण झाली. दिवसभरात सोन्या आणि चांदीच्या दरात चढउतार सुरू राहील, असे सराफ व्यवसायिकांचं म्हणणं आहे. कारण जागतिक बाजारातही मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहे. त्यामध्येच केंद्र सरकारनेही आयात शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला.मागील काही वर्षात भारतात सोन्याच्या किमतीमध्ये मोठी वाढ होत आहे. त्यामध्येच आता पुन्हा एकदा आयात शुल्कात वाढ करण्यात आली. एक वर्ष सोने न खरेदी करण्याचे नरेंद्र मोदी यांनी जनतेला आवाहन केले. मात्र, एक वर्षानंतर सोन्याचे भाव कमी होणार का? हा देखील प्रश्न विचारला जात आहे. इराण आणि अमेरिका युद्धाचा भारताला मोठा फटका बसताना दिसत आहे.

## गोव्यात छातीत दुखले, बेंगळुरूत घेतली अपॉइंटमेंट!

### त्याआधीच 'हार्ट अटॅक'ने अभिनेत्याचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभिनेता दिलीप राज याच्या मृत्यूमुळे एकच खळबळ उडाली आहे. पण त्याची एक चूक त्याच्या जीवावर बेतली. जर ती त्याने केली नसती तर कदाचित त्याचा जीव वाचला असता. 'हार्ट अटॅक'ने त्याचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, याबाबत आता अशी माहिती समोर येत आहे की दिलीप राजच्या छातीत दुखले होते. त्याने त्यासाठी अपॉइंटमेंटही घेतली होती. पण त्याआधीच हृदयाने त्याचा घात केला. अभिनेता आणि निर्माता दिलीप राजचा अचानक मृत्यूमुळे एकच खळबळ उडाली आहे. 'हार्ट अटॅक'ने त्याचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, याबाबत



आता अशी माहिती समोर येत आहे की दिलीप राजच्या छातीत दुखले होते त्याने त्यासाठी अपॉइंटमेंटही घेतली होती. पण त्याआधीच हृदयाने त्याचा घात केला.

माहितीनुसार दिलीप राज काही दिवसांपूर्वी गोव्याला फिरायला गेला होता. गोव्यात मजा

पान २ वर

### आजचे अभीष्टचिंतन





प्रा. सौ. विद्या लक्ष्मण
अमळनेर



श्री. किशोर पाटील
अमळनेर



श्री. चंद्रकांत पवार
शिक्षक



श्री. दीपक पाटील
अमळनेर

### दिनविशेष

१४ मे

- ऑल इंडिया रेडिओचे आकाशवाणी असे नामकरण करण्यात आले.
- देशातील आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला सहकारी साखर कारखान्याची साखर आयुक्त कार्यालयात सहकार कायदा कलम चारखाली नोंदणी झाली. इंदिरा गांधी भारतीय महिला विकास सहकारी साखर कारखाना असे त्याचे नाव देण्यात आले आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**

**जय भारत...!**

**जय स्वदेशी...!!**

## संपादकीय

### एकटेच जायचे रे...

समस्त भारतीयांना अभिमान वाटावा असे प्रतिभावंत कवी, तत्त्वज्ञ रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंती दिनाचा मुहूर्त साधून ९ मे रोजी पश्चिम बंगालमध्ये शुभेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तब्बल ३४ वर्षांचा डाव्या पक्षांचा पश्चिम बंगालमधील सत्तेचा अभेद्य गड तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी उद्ध्वस्त करतील, असे सन २०११ मध्ये किती जणांना वाटले होते? आणि आत्ता त्याच ममता बॅनर्जी यांची मुख्यमंत्रिपदाची खुर्ची भारतीय जनता पक्ष खेचून घेईल, असे तरी किती जणांना वाटले होते? एकेकाळी भाजपचे श्रेष्ठ नेते अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'च्या मंत्रिमंडळात रेल्वे खाते भूषविणाऱ्या ममता बॅनर्जी या नंतर भाजपशी उभा दावा मांडतील, असे किती जणांना वाटले होते? आणि ज्या शुभेंदू अधिकारी यांच्यावर आपण भ्रष्टाचाराच्या आरोपांची राळ उठवली होती तेच शुभेंदू आपल्याच पक्षाचा झेंडा हातात घेऊन मुख्यमंत्री होतील, असे तरी भाजपमधील किती जणांना वाटले होते? यातील पहिल्या दोन प्रश्नांच्या उत्तरांवर मतभेद होतील; तर पुढचे दोन प्रश्न अनेकांना 'बावळट' वाटू शकतील, हे आजचे राजकीय वास्तव. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि हजारो भाजप कार्यकर्त्यांची उपस्थिती, हा विजय भाजपसाठी किती महत्त्वाचा आहे, हे दर्शविते. या सगळ्याकडे उपरोल्लेखित राजकीय वास्तवाच्या पार्श्वभूमीवर पाहायला हवे.

पश्चिम बंगालच्या भोवतालच्या टापूत कमळाचे भरघोस पीक येत असताना वंगभूमीत मात्र पक्षाला अपेक्षित यश मिळत नव्हते. अत्यंत आक्रमक ममता बॅनर्जी हे त्यामागचे कारण. तरीही भाजपने हार न मानता ममतांशी कडवा संघर्ष सुरू ठेवला. दहा वर्षांच्या कालावधीत एक आकडी आमदारसंख्येवरून २०७ वर घेतलेली हनुमानउडी हे त्या संघर्षाचे घसघशीत यशोफल. त्यास निवडणूक आयोग, अन्य केंद्रीय यंत्रणा यांचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष हातभार नाही, असे कुणीही सुज्ञ व्यक्ती म्हणणार नाही. त्याच वेळी धार्मिक ध्रुवीकरणाचे प्रयत्न भाजपने केले असे म्हणावे, तर त्यासाठीची सुपीक जमीन खुद्द बॅनर्जी यांनीच तयार केली, हे कसे नाकारणार? बांगलादेशी घुसखोरांबाबत ममतांची भूमिका ही कुंपणावरच्या मतदारांना आपसूकपणे भाजपच्या टापूत ढकलणारी ठरली, हेही कसे नाकारणार? अर्थात आता हा इतिहास झाला. निकालाआधीचे वाद, निकालानंतरची रक्तरंजित हिंसा हा देखील इतिहास झाला. वर्तमान अगदी स्पष्ट, स्वच्छ आहे की भाजपचे शुभेंदू अधिकारी हे आता पश्चिम बंगालचे सर्वोच्च 'अधिकारी' झालेले आहेत. त्यामुळे आता चर्चा करायला हवी ती या वर्तमानाची आणि भविष्याची. शुभेंदू हे एकेकाळचे ममतांचे विश्वासू सहकारी. ममतांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांची तृणमूलमध्ये सद्दी वाढू लागल्यानंतर त्यांनी भाजपची कास धरली हे सर्वश्रुतच. विचारांशी निष्ठा वगैरेबाबत न बोललेलेच बरे, अशी आजची स्थिती. मुळात सामान्यांचे पोट डाव्या विचारांनी भरत नाही, सेक्युलर विचारांनी भरत नाही आणि हिंदुत्ववादी विचारांनीही भरत नाही. पोट भरण्यासाठी लागते रोजगारनिर्मिती, उद्योग उभारणी आणि सोबतीला सामाजिक शांतता, सौहार्द.

सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असे हे राज्य सध्या आर्थिक कुंठितावस्था सोसत आहे. तेथील उद्योगक्षेत्रात नवे प्राण फुंकणे नितांत गरजेचे झालेले आहे. त्यासाठी खासगी गुंतवणूक अधिकाधिक कशी आकर्षित करता येईल, हे पाहावे लागणार आहे. त्यामुळे एकेकाळी सिंगूर, नंदीग्राम येथील उद्योगांबाबत घेतलेली भूमिका शुभेंदू यांनी अर्थातच गंगेत सोडून दिलेली असणार, ही अपेक्षा. सार्वजनिक वाहतूक, घरबांधणी या क्षेत्रांत देखील राज्याने फार मोठे दिवे लावलेले आहेत, असे नाही. मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्यापुढे ही तातडीची प्रमुख आव्हाने असतील. ममतांच्या काळात गुन्हेगारी, खंडणीखोरी वाढल्याचे व त्यात सत्ताधारीच सहभागी असल्याचे अतोनात आरोप झाले. ही विकृत संस्कृती त्यांना कठोरपणे मोडून काढावी लागेल. विकासाची गंगा केवळ शहरांच्याच ओंजळीत पडणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल. त्याचबरोबर मोलाचे असेल ते सगळ्यांना सोबत घेऊन पुढे जाणे. निवडणुकांच्या निमित्ताने उफाळलेली राजकीय आणि धार्मिक कटुता शमवणे यांस त्यांना प्राधान्यक्रम द्यावा लागेल. आपल्या एका प्रख्यात कवितेत, वेगळ्या संदर्भात रवींद्रनाथांनी, 'एकला चलो रे' अशी हाक दिली होती. मात्र, शुभेंदू अधिकारी आणि भाजप यांच्यासाठीची ताजी हाक 'एकटेच जायचे रे...' अशी आहे; ती ते ऐकतील, ही आशा.

# पाच गॅझेट्स रात्री झोपताना बंद करा; दरमहा लाईटबिलचे पैसे वाचवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या काळात घरातील इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसमुळे लाईट बिल वाढत चालले आहे. आपण अनेकदा टीव्ही, वाय–फाय किंवा चार्जर रिमोटने बंद करतो, पण मुख्य स्विच चालूच ठेवतो. ही उपकरणे 'स्टँडबाय मोड'वर असतानाही सतत वीज वापरत असतात. रात्रीच्या वेळी अनावश्यक चालणारे हे गॅजेट्स बंद केल्यास महिन्याकाठी तुमच्या बिलात लक्षणीय घट होऊ शकते. चला तर मग याविषयीची माहिती जाणून घेऊया.

विजेची बचत करणे हा केवळ पैशांचा प्रश्न नसून ते पर्यावरणासाठीही गरजेचे आहे. रात्री झोपताना वाय–फाय राउटर, ओव्हन आणि सेट–टॉप बॉक्स यांसारख्या वस्तू पूर्णपणे बंद करण्याची सवय लावा. ही छोटी पावले तुमच्या वार्षिक घरखर्चात मोठी बचत घडवून आणतील. सुरक्षितता आणि आर्थिक बचत या दोन्ही दृष्टीकोनातून हे बदल करणे आजच्या काळाची गरज आहे.

**१) वाय–फाय राऊटर**

बहुतेक घरांमध्ये वाय–फाय राउटर २४ तास चालू असते. रात्री जेव्हा सर्वजण झोपलेले असतात, तेव्हा इंटरनेटचा वापर शून्य असतो, तरीही राउटर वीज वापरतच असते. एका राउटरमुळे वर्षभरात बऱ्याच युनिट्सचा वापर होतो. रात्री झोपण्यापूर्वी राउटर बंद केल्याने केवळ विजेची बचत होत नाही, तर उपकरणाचे आयुष्यही वाढते आणि रेडिएशनचा धोकाही कमी होतो.

**२) टेलिव्हिजन आणि सेट–टॉप बॉक्स**

आपण सहसा रिमोटने टीव्ही बंद करतो आणि सोडून देतो. रिमोटने टीव्ही बंद केल्यावर तो 'स्टँडबाय मोड'वर असतो, म्हणजे त्यातील अंतर्गत सर्किट चालू असते. यासोबतच सेट–टॉप बॉक्स देखील चालू राहतो. हे दोन्ही मिळून रात्रभर सतत वीज ओढत असतात. त्यामुळे मुख्य स्विचमधून टीव्ही बंद करण्याची सवय लावल्यास दरमहा बऱ्याच रुपयांची बचत होऊ शकते.

**३) मोबाईल आणि लॅपटॉप चार्जर्स :**


अनेकांना सवय असते की मोबाईल चार्ज झाल्यावर ते फक्त केबल काढतात, पण चार्जरचा स्विच चालूच ठेवतात. चालू असलेल्या चार्जरमध्ये ट्रान्सफॉर्मर असतो, जो थोड्या प्रमाणात वीज खर्च करत राहतो. हे जरी दिसायला कमी वाटले, तरी घरातील अनेक चार्जर मिळून महिन्याकाठी बिलावर परिणाम करतात. तसेच, रात्रभर मोबाईल चार्जिंगला लावणे बॅटरीसाठीही घातक ठरू शकते.

**४) मायक्रोवेव्ह ओव्हन**

मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये एक डिजिटल घड्याळ किंवा डिस्प्ले असतो. हा डिस्प्ले 24 तास चालू राहण्यासाठी सतत विजेचा वापर करतो. जेव्हा तुम्ही ओव्हन वापरत नसाल, तेव्हा त्याचा प्लग काढून ठेवणे किंवा स्विच बंद करणे केव्हाही चांगले. स्वयंपाकघरातील अशा छोट्या उपकरणांकडे आपले लक्ष जात नाही, पण ती बिलात वाढ करण्यास कारणीभूत ठरतात.

**५) एअर प्युरिफायर आणि इतर स्मार्ट होम डिव्हाइस**

रात्रीच्या वेळी जर हवेची गुणवत्ता चांगली असेल, तर एअर प्युरिफायर सुरू ठेवण्याची गरज नसते. तसेच स्मार्ट स्पीकर्स (उदा. अलेक्सा, गुगल होम) जे कायम 'लिसनिंग मोड'वर असतात, ते देखील वीज वापरतात. अनावश्यक वाटणारी ही छोटी उपकरणे रात्री बंद केल्यास तुमची दरमहा मोठी बचत होऊ शकते.




## उन्हाळ्यात कारले खाल्ल्यास काय होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कारले शरीर थंड ठेवते. निर्जलीकरण टाळण्यास मदत करते. कारल्यातील व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट्समुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**शरीर थंड व हायड्रेटेड :** कारले उन्हाळ्यात शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

रक्त शुद्धीकरण व त्वचा : कारले रक्त स्वच्छ करते. ज्यामुळे उन्हाळ्यात होणाऱ्या त्वचेच्या समस्या कमी होण्यास मदत.


**मधुमेह नियंत्रण :** कारल्यातील घटक साखरेची पातळी नियंत्रित ठेवतात.

**पचन सुधारते :** उन्हाळ्यात होणारा अपचनाचा त्रास कमी करण्यासाठी कारले उपयुक्त आहे.

**अतिसेवन टाळा :** रोज जास्त प्रमाणात खाल्ल्याने पोटाचा त्रास, जुलाब किंवा उलट्या होऊ शकतात.

**काय खाऊ नये :** कारल्यासोबत आंबा, दूध, दही, मुळा किंवा भेंडी खाणे टाळावे, यामुळे मळमळ, पोटात जळजळ होऊ शकते.





**सन्मान वाढदिवसाचा..!**

**अमळनेर : येथील सुपरिचित 'एस. के. ज्वेलर्स'चे संचालक सचिन भामरे यांचा बुधवार, दि. १३ मे रोजी वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना 'ग्लोबल महातेज' परिवारातील मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी व ब्युरो चीफ रजनीकांत पाटील.**

## शून्य रुपये खर्च, पाल घरात कधीच दिसणार नाही

### एकदा उपाय केला की विषयच संपला!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरातील पालींमुळे अनेक महिला त्रस्त असतात. कितीही उपाय करून पाहिले तरीही पाल काही घरातून निघून जात नाही. परंतु किचनमधीलच या दोन वस्तू वापरून तुम्ही पालींना घरातून कायमचे पळवून लावू शकता. ते कसे शक्य आहे, हे जाणून घेऊया.

अनेकदा तुम्ही घराच्या छतावर, भिंतींवर तसेच किचनमध्ये कोपऱ्यात पाल पाहिली असेल. एकदा घरात पाल झाली की ती घरातून सहजासहजी निघून जात नाही. त्यासाठीच पालींचा नायनाट व्हावा यासाठीचा एक घरगुती उपाय जाणून घेऊ या.

घरात पाल झाल्यावर लवकरच त्या आणखी पिलांना जन्म देतात. परिणामी सगळीकडे पालीच–पाली दिसतात. त्यामुळे कधीकधी चिडचीडही होते. परंतु तुम्ही हा उपाय करून पाहिला तर घरातील पाली निघून जातील.

पालींना काही विशिष्ट वस्तूंचा गंध आवडत नाही. हा गंध आला की पाल पळून जाते. यातील काही वस्तू तुमच्या किचनमध्येही असतात. पालींना लसून आणि कांद्याचा गंध आवडत नाही. त्यामुळे तुम्ही घरात लसूण आणि कांद्याच्या पाकळ्या ठेवल्या तर पाली पळून निघून जातात. हा उपाय करून पाहिल्यावर पाली नंतर येण्याची हिंमतही करत नाहीत, असेस सांगितले जाते. या उपायामुळे तुमची कायमची डोकेदुखी कमी होऊ शकते.

## हर भारतीय के हृदय में गर्व और प्रेरणा की ज्वाला जगानेवाले कैप्टन हनीफ उद्दीन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कारगिल युद्ध १९९९ में जब दुश्मन ने ऊंची बर्फीली चोटियों पर कब्जा जमा रखा था, तब ११ राजपूताना राइफल्स की टुकड़ी तुरतुक सेक्टर में तैनात थी। इसी बटालियन का युद्ध उद्घोष था "राजा रामचंद्र की जय" और उसी उद्घोष के साथ एक २५ वर्ष का युवा अधिकारी अपने साथियों का नेतृत्व कर रहा था, कैप्टन हनीफ उद्दीन।

७ जून १९९७ को कमीशन प्राप्त करने के बाद उन्होंने लगभग २ वर्ष भारतीय सेना में सेवा दी थी और कठिन क्षेत्रों का अनुभव हासिल किया था।

जून १९९९ की शुरुआत में खुफिया जानकारी सीमित थी। पॉइंट ५५९०, जिसकी ऊंचाई लगभग १८००० फीट थी, पर दुश्मन की सटीक स्थिति का पता लगाना बेहद जरूरी था। ६ और ७ जून १९९९ की रात कैप्टन हनीफ 4 जूनियर रैंक के साथियों के साथ पेट्रोलिंग मिशन पर निकले।

बर्फ से ढकी ढलानों, तेज हवाओं और शून्य से नीचे तापमान में २ दिन तक लगातार चढ़ाई के बाद वे लक्ष्य के करीब पहुंचे। हर कदम मौत के साए में था।

जैसे ही वे आगे बढ़े, दुश्मन ने उन्हें देख लिया। ऊंचाई पर बैठे पाकिस्तानी सैनिकों ने अचानक अंधाधुंध गोलीबारी शुरू कर दी। बर्फीली चोटियों पर गोलियों की आवाज गूंज उठी। स्थिति अत्यंत गंभीर थी। दुश्मन संख्या में अधिक था और रणनीतिक बढ़त उसके पास थी।



उसी क्षण कैप्टन हनीफ ने वह निर्णय लिया जिसने उन्हें अमर कर दिया। उन्होंने अपने ४ साथियों को सुरक्षित निकालने के लिए स्वयं दूसरे फ्रंट से फायरिंग शुरू की, ताकि दुश्मन का पूरा ध्यान उनकी ओर केंद्रित हो जाए। गोलियों की बारिश के बीच वे अकेले डटे रहे। उनके हथियार लगभग समाप्त हो चुके थे, शरीर पर गोलियां लगीं, फिर भी वे पीछे नहीं हटे। उनका लक्ष्य स्पष्ट था, साथियों की जान बचाना।

लगभग २०० मीटर दूर लक्ष्य पोजीशन से पहले वे गंभीर रूप से घायल हुए। ६ जून १९९९ को, अपने कमीशन के ठीक २ वर्ष पूरे होने के दिन, वे वीरगति को प्राप्त हुए। उनकी आयु मात्र २५ वर्ष थी। उनकी इस अदम्य वीरता से प्रेरित होकर उनकी टीम ने आगे बढ़कर दुश्मन की पोजीशन पर कब्जा किया और उसे बनाए रखा।

उनके असाधारण साहस, नेतृत्व और सर्वोच्च बलिदान के लिए उन्हें मरणोपरांत वीरचक्र से सम्मानित किया गया, जो भारत का ३ रा सबसे बड़ा वीरता पुरस्कार है। सेना ने तुरतुक क्षेत्र के एक सब सेक्टर का नाम उनके सम्मान में "हनीफ उद्दीन सब सेक्टर" रखा। दिल्ली के मयूर विहार फेज १ में लगभग १.७५ कि.मी. लंबी सड़क और एक सरकारी विद्यालय उनके नाम पर है। उनके छोटे भाई द्वारा लिखी पंक्तियां, "एक पल में है सच सारी जिंदगी का, इस पल में जी लो यारों, यहां कल है किसने देखा", मानो उनके जीवन की सच्चाई बन गईं। कैप्टन हनीफ उद्दीन ने यह सिद्ध किया कि एक सच्चा सैनिक केवल १ पहचान रखता है, भारतीय। १९९९ की उन बर्फीली चोटियों पर दिया गया उनका बलिदान आज भी हर भारतीय के हृदय में गर्व और प्रेरणा की ज्वाला जगाता है।

## बेंगळुरूत घेतली अपॉइंटमेंट!

**पान १ वरून :** करत असताना त्याच्या छातीत दुखू लागले होते. त्याला हार्ट अटॅकचा इशारा आधीच मिळाला होता. त्याला आपल्याला 'हार्ट अटॅक' आहे, असा संशयही आला होता. म्हणून त्याने बेंगळुरूला येऊन तपासणी करायचे ठरविले. यासाठी त्याने अपॉइंटमेंटही घेतली होती. १३ मे २०२६ रोजीच त्याला अपॉइंटमेंटला जायचे होते. १२ मे २०२६ रोजी रात्री तो त्याच्या मालिकेतील कलाकारांशी फोनवर चांगला बोललाही होती. पण नंतर रात्री छातीत दुखायला सुरूवात झाली. त्याला लगेच बेंगळुरूतील कुमारस्वामी लेआआऊट येथील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. जेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. दिलीप राज गोव्याला असताना त्याच्या छातीत दुखू लागले तेव्हाच जर लगेच रुग्णालयात गेला असता तर कदाचित त्याचा जीव वाचला असता. त्याची एक छोटीशी चूक, निष्काळजीपणा त्याच्या जीवावर बेतला. दिलीप राजचा जन्म २ सप्टेंबर १९७८ रोजी बेंगळुरूत झाला. महाविद्यालयीन काळात कोरिओग्राफीची आवड असल्याने दिलीप राज तो एका नाट्यमंडळात सामील झाला. नंतर अभिनयाकडे वळला. त्याने टेलिव्हिजनच्या माध्यमातून अभिनय क्षेत्रात प्रवेश केला. सगळ्यात आधी 'कंबडा माने', त्यानंतर जननी, अर्ध सत्य, रांगोळी, कुमकुम भाग्य, मांगल्य, प्रीतीगती इत्यादी मालिकांमध्ये काम केले. २००५ मध्ये त्याने 'भाई फ्रेंड' या चित्रपटाद्वारे चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर २००७ मध्ये 'मिलाना' या चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेत दिसला. पुढे त्याने '७ ओ'क्लॉक', 'क्षण क्षण' आणि अगदी अलीकडे 'लव्ह मॉकटेइल ३' या चित्रपटांमध्ये अभिनय करून कन्नड चित्रपटसृष्टीत एक प्रतिभावान अभिनेता म्हणून लोकप्रियता मिळविली. 'रथसप्तमी' या मालिकेद्वारे टेलिव्हिजनवर पुनरागमन केलेल्या दिलीपने काही टेलिव्हिजन रिॲलिटी शोसाठी सूत्रसंचालक म्हणूनही काम केले आहे. राज्जी कन्नड वाहिनीवर प्रसारित होणाऱ्या 'हिटलर कल्याणा' या मालिकेत दिलीपने अभिनय केला असून त्याने स्वतःच त्या मालिकेची निर्मितीही केली आहे.

## पिकअप व्हॅनमधून बैलांची कोंबून वाहतूक

**पान १ वरून**

गणेश पाटील यांच्याविरुद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पोलिसांनी दोन लाख पन्नास हजार रुपये किमतीची पिकअप व्हॅन व एक लाख नव्वद हजार रुपये किमतीचे चार बैल असा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा हवालदार विनोद भोई पुढील तपास करीत आहेत.

# करोडोंची संपत्ती आणि व्यवसायाचे जाळे

## स्विंग किंग भुवनेश्वर कुमारचे 'मैदानाबाहेरील' साम्राज्य पाहिले का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेटचा 'स्विंग किंग' भुवनेश्वर कुमार केवळ मैदानावरच नाही, तर व्यवसायाच्या खेळपट्टीवरही किंग ठरत आहे. सचिन तेंडुलकर या दिग्गजाला रणजी चषकाच्या सामन्यात शून्यावर बाद केल्यानंतर भुवनेश्वर कुमार पहिल्यांदा चर्चेत आला होता. त्यानंतर देशांतर्गत क्रिकेट, आयपीएल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भुवीच्या कामगिरीचा आलेख चढताच राहिला आहे. गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रीय संघात जागा मिळविण्यासाठी झगडत असलेला भुवनेश्वर आयपीएलमध्ये मात्र सातत्याने दमदार कामगिरी करत आहे. यापूर्वी दोन वेळा 'पर्पल कॅप' मिळविणारा भुवनेश्वर यंदा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून दमदार कामगिरी करत आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये तो २२ विकेट्ससह सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये अव्वल स्थानी आहे.

**भुवनेश्वर कुमारची व्यावसायिक खेळी**

जगभरातील क्रिकेट मैदाने गाजवत असताना, भुवी पडद्यामागे एक वेगळे साम्राज्य उभारत होता. शिवालिक असोसिएट्सच्या माध्यमातून त्याने व्यवसायात क्षेत्रात पहिले पाऊल टाकले. यात त्याच्या यशाचा पाया असलेल्या कुटुंबाचा पत्नी नुपूर आणि आई इंद्रेश देवी यांचा मोठा वाटा आहे. शिवालिक असोसिएट्स प्रायव्हेट लिमिटेड ही मेरठमधील एक खाद्य आणि पेय कंपनी आहे. या कंपनीत तो २०१८ मध्ये संचालक म्हणून सहभागी झाला. त्याची पत्नी नुपूर नागर आणि त्याची आई इंद्रेश देवीदेखील या कंपनीच्या संचालक मंडळावर आहेत.

**बीके क्रिकेट अकादमी**

याचबरोबर भुवनेश्वरने मेरठच्या प्रतापपूरमध्ये २०२४ मध्ये बीके क्रिकेट अकादमी सुरू केली आहे. ही एक नोंदणीकृत एक एलएलपी आहे. जेथे आज जेथे मेरठमधील शेकडो मुले क्रिकेटचे धडे घेत आहेत. येथे केवळ फलंदाजी, गोलंदाजीच नव्हे तर संयम, शिस्त आणि दूरदृष्टीचे धडेही गिरवत आहेत.

**पिकल प्रोजचा सह–संस्थापक**

भुवनेश्वर कुमार हा पिकल प्रोज या कंपनीच्या सह–संस्थापकांपैकी एक आहे. देशभरात पिकलबॉल खेळाचा प्रसार आणि विकास करण्याच्या उद्देशाने, जुलै २०२५ मध्ये या कंपनीची सुरुवात करण्यात आली होती. सहकारी क्रिकेटपटू इशांत शर्मा आणि उमेश यादव यांच्यासह भुवनेश्वरने या खेळासाठी अधिक अद्ययावत पायाभूत सुविधा उभारण्याच्या उद्देशाने 'Legaxy' आणि 'M३M Foundation' यांच्याशी भागीदारी केली आहे. शहरे, लहान गावे आणि अगदी तळागाळातील भागांमध्ये मिळून ५० आधुनिक पिकलबॉल कोर्ट्स उभारणे, हे त्यांचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून हा खेळ सर्वांसाठी अधिक सहज उपलब्ध होईल.

**भुवनेश्वरची एकूण संपत्ती किती?**

स्विंग किंग म्हणून ओळखला जाणारा भुवनेश्वर कुमार ॲसिक्स, प्लेयरझपॉट, न्यूट्रामंत्रा यांसारख्या ब्रँड्सची जाहिरात करतो. हे असे ब्रँड्स आहेत ज्यांचा विश्वासार्हतेवर जास्त ग्लॅमरवर कमी विश्वास आहे. भुवनेश्वरची एकूण संपत्ती ७०–७५ कोटींच्या दरम्यान असल्याचा अंदाज आहे. त्याच्या गॅरेजमध्ये अनेक बीएमडब्ल्यू, ऑडी क्यू३ आणि मर्सिडीज सी–क्लास या अलिशान कार आहेत. याचबरोबर एक भुवनेश्वरने एक सुंचर बंगलाही बांधला आहे. भुवनेश्वर जेव्हा क्रिकेटमधून निवृत्ती घेईल तेव्हा तो समालोचनाच्या संधी शोधणारा एखादा माजी क्रिकेटपटू नसेल, तर तो एक व्यावसायिक असेल. एक संचालक असेल. असा एक माणूस, ज्याने इतर सर्वजण त्याला गोलंदाजी करताना पाहत असतानाच, स्वतः काहीतरी उभारून ठेवले आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# पराक्रम, विद्वत्ता आणि स्वाभिमानाचे तेजस्वी प्रतीक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्मदिन हा महाराष्ट्राच्या इतिहासातील अभिमानाचा दिवस मानला जातो. शौर्य, विद्वत्ता, स्वराज्यनिष्ठा आणि धर्मरक्षणासाठी अखेरच्या श्वासापर्यंत संघर्ष करणारे संभाजी महाराज हे मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पराक्रमाबरोबरच अभ्यासू वृत्ती, राजकीय दूरदृष्टी आणि राष्ट्रनिष्ठा यांचा अद्भुत संगम दिसून येतो. त्यामुळेच त्यांना 'धर्मवीर' ही उपाधी मिळाली.

### जन्म आणि बालपण

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ला येथे झाला. ते छत्रपती शिवाजी महाराज आणि सईबाई यांचे सुपुत्र होते. लहान वयातच आईचे छत्र हरपल्याने त्यांचे संगोपन जिजाबाई यांच्या संस्कारांत झाले. बालपणापासूनच त्यांना युद्धकला, राज्यकारभार, राजनय आणि अनेक भाषांचे शिक्षण देण्यात आले. संभाजी महाराज संस्कृत, फारसी, हिंदी आणि मराठी भाषांमध्ये पारंगत होते. त्यांच्या विद्वत्तेचा प्रत्यय "बुधभूषण" या संस्कृत ग्रंथातून येतो. युद्धभूमीतील पराक्रमाइतकीच त्यांची ओळख एक विद्वान राजा म्हणूनही आहे.



### स्वराज्याच्या रक्षणासाठी अखंड संघर्ष

इ. स. १६८० मध्ये शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. त्या काळात औरंगजेब स्वतः दक्षिणेत उतरून मराठा साम्राज्य नष्ट करण्याच्या प्रयत्नात होता. अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी अत्यंत धैर्याने मुघल, पोर्तुगीज, इंग्रज आणि सिद्दी यांच्याविरुद्ध लढा दिला. त्यांनी जवळपास नऊ वर्षे औरंगजेबाच्या बलाढ्य सैन्याला रोखून धरले. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने अनेक निर्णायक मोहिमा यशस्वी केल्या. स्वराज्यावर आलेले संकट दूर करण्यासाठी त्यांनी स्वतः रणांगणात उतरून नेतृत्व केले.

### संभाजी महाराजांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य

१) स्वराज्याचे सक्षम संरक्षण
संभाजी महाराजांनी शिवाजी महाराजांनी उभे केलेले स्वराज्य टिकवून ठेवण्यासाठी प्राणपणाने संघर्ष केला. औरंगजेबासारख्या शक्तिशाली बादशहाला त्यांनी दीर्घकाळ झुंज दिली. मराठ्यांचा आत्मविश्वास आणि स्वराज्याची जाज्वल्य भावना त्यांनी जीवंत ठेवली.

२) धर्मरक्षणासाठी बलिदान
संभाजी महाराजांच्या जीवनातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे धर्मासाठी दिलेले बलिदान. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ करून धर्मांतर करण्याचा दबाव टाकला; मात्र त्यांनी मृत्यू पत्करला पण धर्म आणि स्वाभिमानाशी तडजोड केली नाही. त्यामुळे इतिहासात त्यांचे नाव "धर्मवीर" म्हणून अजरामर झाले.

३) विद्वान आणि साहित्यप्रेमी राजा
संभाजी महाराज केवळ योद्धाच नव्हते, तर ते उत्कृष्ट साहित्यिकही होते. "बुधभूषण", "नायिकाभेद", "सातशतक" यांसारख्या ग्रंथांची निर्मिती त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देते. राज्यकारभाराबरोबर साहित्य आणि संस्कृतीचे जतन करण्याचे कार्य त्यांनी केले.

४) परकीय शक्तींना दिलेले आव्हान
पोर्तुगीज आणि इंग्रजांच्या वाढत्या प्रभावाला त्यांनी कठोर विरोध केला. कोकण किनारपट्टीवरील सागरी सामर्थ्य मजबूत करण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले.

अमर बलिदान
इ. स. १६८९ मध्ये संगमेश्वर येथे संभाजी महाराजांना पकडण्यात आले. त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आले; पण त्यांनी स्वराज्य, धर्म आणि राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. ११ मार्च १६८९ रोजी त्यांचे बलिदान झाले. त्यांच्या मृत्यूनंतरही मराठ्यांचा संघर्ष थांबला नाही; उलट त्यातून स्वराज्याची ज्वाला अधिक प्रखर झाली.

### आजच्या पिढीसाठी प्रेरणा

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. संकटांपुढे न झुकणे, राष्ट्रासाठी समर्पण, विद्वत्तेची कास धरणे आणि स्वाभिमानासाठी लढणे हे गुण त्यांच्या जीवनातून शिकण्यासारखे आहेत. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आपण त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक एकात्मतेची भावना दृढ केली पाहिजे. छत्रपती संभाजी महाराज हे केवळ इतिहासातील राजा नव्हते, तर ते स्वाभिमान, शौर्य आणि धर्मनिष्ठेचे जीवंत प्रतीक होते. त्यांच्या अद्वितीय पराक्रमामुळे आणि बलिदानामुळे मराठा साम्राज्याची ज्योत अखंड तेवत राहिली. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेणे हीच खरी आदरांजली ठरेल.

# एकल मातांची प्रेरणादायी झेप

## संघर्षातून उभी राहिलेली यशस्वी जीवनकथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रेरणादायक....



"पतीच्या निधनानंतर आयुष्य अक्षरशः कोलमडून गेले होते. दोन मुलांची जबाबदारी, घरखर्च आणि भविष्याची चिंता डोक्यावर होती. नोकरीही मिळत नव्हती. शेवटी हार न मानता कपडे विक्रीचा छोटासा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला व्यवसायात तोटाच झाला. पण, मुलांसाठी पुन्हा उभी राहिले. कष्ट केले. आज माझी दोन्ही मुले उच्चशिक्षण घेत आहेत आणि व्यवसायही सुरू आहे. सिंगल मदर म्हणून स्त्री आनंदाने, स्वाभिमानाने आणि खंबीरपणे आयुष्य जगू शकते, हे समाजाने स्वीकारले पाहिजे," अशा शब्दांत एकल माता असलेल्या अर्चना वाघमारे (नाव बदलले आहे) या आपल्या संघर्षाचा प्रवास सांगत होत्या

अर्चना यांच्यासारख्या कित्येक महिला आज महाराष्ट्रात एकल माता (सिंगल मदर) म्हणून आयुष्य जगत आहेत. आई म्हणजे माया, आधार आणि त्यागाचे प्रतीक. पण या एकल मातांनी त्यापुढे जात कुटुंबाचा कणा बनण्याची जबाबदारीही समर्थपणे सांभाळली आहे. राज्यात सध्या एकल मातांचे प्रमाण वाढत असून, २५ ते ५० वयोगटातील अनेक महिलांनी एकल माता म्हणून जगण्याचा मार्ग स्वीकारला आहे. जागतिक मातृ दिनानिमित्त घेतलेल्या आढाव्यात मुंबई, पुणे, सातारा, सांगली, नागपूर, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर अशा विविध जिल्ह्यांसह राज्यातील ग्रामीण भागातही एकल मातांचे प्रमाण वाढत असल्याची बाब समोर आली आहे.

घटस्फोट, पतीचे निधन, कौटुंबिक मतभेद किंवा आयुष्यातील कठीण प्रसंगांमुळे अनेक महिलांना एकट्याने आयुष्याचा गाडा ओढावा लागत आहे. पण त्या निर्भीडपणे आयुष्य जगत आहेत. स्वतःचा व्यवसाय करण्याचा मार्ग अनेक एकल मातांनी निवडला आहे. कपडे विक्रीचा व्यवसाय, हॉटेल व्यवसाय, छायाचित्रण, ब्युटीपार्लर, घरगुती पदार्थ विक्री, ऑनलाइन व्यवसाय अशा विविध क्षेत्रांत महिलांनी स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या अनिता (नाव बदलले आहे) म्हणाल्या, "दिवसभर ऑफिसमध्ये काम आणि घरी आल्यानंतर मुलांची जबाबदारी. स्वतःसाठी वेळच मिळत नाही. पण, मुलांच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहिले की, पुन्हा जगण्याची ताकद मिळते."

महिला व्यावसायिक संध्या आढाव-पाटील म्हणाल्या, की पतीपासून स्वतःहून विभक्त झाल्यानंतर माझ्या मुलीची मी स्वतः जबाबदारी घेतली. त्यानंतर अनेकांचे टोमणेही ऐकावे लागले. पण, मी खचले नाही. कोणाच्याही मदतीशिवाय एकटीने स्वतःचा व्यवसाय सुरू केला. अनेक अडचणीही आल्या. पण त्यातूनच जगण्याची नवी वाट सापडली. आज स्वतःच्या मेहनतीने एक ते दीड कोटी रुपयांची उलाढाल असलेला व्यवसाय मी उभा केला आहे. माझी मुलगी वकिलीचे शिक्षण घेत आहे. सिंगल मदर म्हणून जगणे म्हणजे समाजाच्या प्रश्नांना, टोमण्यांना आणि संघर्षांना रोज सामोरे जाणे. पण जी स्त्री स्वतःला घडवते आणि मुलांसाठी खंबीरपणे उभी राहते, ती केवळ आई राहत नाही, तर समाजासाठी प्रेरणा बनते.

### सपोर्ट ग्याप ठरताहेत मानसिक आधार

तीन शहरांत काही स्वयंसेवी संस्था आणि सपोर्ट ग्रुप एकल मातांसाठी आधारवड ठरत आहेत. कायदेशीर सल्ला, समुपदेशन, रोजगाराच्या संधी, संवाद आणि मानसिक आधार देण्याचे काम या संस्था करत आहेत. वंचित विकास संस्थेच्या कार्यवाह मीना कुर्लेकर म्हणाल्या, की आम्ही 'अभया' गटाच्या माध्यमातून एकल महिलांसाठी काम करत आहोत. अनेक महिला मोठ्या जिद्दीने मुलांची जबाबदारी पेलत आहेत. काहींनी स्वतःचे व्यवसायही उभे केले आहेत. या महिलांसाठी आम्ही विविध उपक्रम राबवत आहोत.

# शहनशाह-ए-गझल!


ते दिवस, तो काळ, फक्त आणि फक्त स्व. के. एल. सैगल या गायक, अभिनेत्याचा होता. सारे वातावरण त्याच्या दर्दभऱ्या सुरांनी व गायकीने भारावलेले होते. ऐकणाऱ्यासोबत गाणारे देखील सैगलचे अनुकरण करू लागले होते. गायक मुकेश, रफी, जगमोहन यांच्यावरच नाही तर नंतर आलेल्या इतर गायकांवर देखील सैगलच्या आवाजाच्या जादूचा प्रभाव होता. पण काळाच्या प्रवाहात अनुकरण करणारे गायक ऐकू येईनासे झाले. अशा वेळी तरले, टिकले तेच ज्यांनी आपली स्वतःची स्वतंत्र गायनशाली बोली विकसित केली, ते होते रफी, किशोरकुमार, मुकेश व एक गझलवेडा 'तलत मेहमूद.'

लखनौ येथे एका व्यापाऱ्याच्या कुटुंबात तलत मेहमूदचा (२४ फेब्रुवारी १९२४) जन्म झाला. सुमारे दहा-अकरा वर्षांचा असताना हा देखणी व गोड गळा लाभलेला तरुण सैगलच्या गाण्यांनी झपाटून गेला होता. कारण तो काळ होता सैगल युगाच्या प्रारंभीचा. वडील मन्सूर मेहमूद उत्तम गात असत. माईक नसताना त्यांचा आवाज हजार लोकांच्या शेवटापर्यंत पोहोचत असे. तलतजींना आवाजाचा वारसा, मन्सूरजींकडून मिळाला होता. पण ते सनातनी प्रवृत्तीचे असल्याने तलतने चित्रपट व गायन क्षेत्रात जाऊ नये, या मताशी ते ठाम होते. तरी देखील सैगलचा व गझलचा वेडा तलत हळूहळू शायरी व गझलमध्ये रमू लागला, गुंतू लागला. सैगलचे चित्रपट अनेकवेळा बघत असे व गाणी पाठ करून स्वतःचा मधुर, थरथरत्या स्वरात हुबेहूब तलत गात असत.

मुकेश व मो. रफी नुकतेच चित्रपटात गायला लागले होते. पण त्यांनी आपल्या प्रशंसकांचा वर्ग झपाट्याने निर्माण केला होता. सैगलच्या निधनानंतर फक्त या दोघांचीच गाणी सर्वत्र ऐकू येत होती. तलतजींचा आवाज मात्र तोपर्यंत रूपेरी पडद्यावर ऐकायला आला नव्हता. त्यांच्या चित्रपटबाह्य गीतांनीच रसिकांना आकर्षित केले होते.

वडील मन्सूरजींच्या विरोधाला न जुमानता तलतजींनी मध्यंतरी, 'मॉरीस संगीत विद्यालयात (नंतरचे भातखंडे संगीत विद्यालय) गुरू पं. एस. सी. आर. भट यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे प्राथमिक धडे घेतले. त्यानंतर खासगी गाण्यांच्या गावोगावी मैफली करीत भटकले. त्या दरम्यान एच.एम.व्ही. कंपनीचे प्रतिनीधी, नव्या आवाजाच्या शोधात लखनौला पोहोचले. तेथे त्यांना कोणीतरी सांगितले, की येथे तलत मेहमूद नावाचा एक मुलगा छान गातो, दुसरा जणू सैगलच आहे तो. त्यांनी तलतजींना ऐकले आणि त्याला कोलकता येथे घेऊन गेले. कंपनीचे संगीतकार कमल दासगुप्तांना त्यांचा आवाज आवडल्याने अनेक गाणी त्यांच्याकडून गाऊन घेतली.

याच कमल दासगुप्तांनी गीतकार फैय्याज हाशमी'च्या एका गीताला तलतजींच्या आवाजात ध्वनिमुद्रित केले. परंतु गीत ऐकल्यानंतर दोघेही नाराज झाले. पण रेकॉर्ड तर बाजारात पोहोचले होते, आणि चमत्कार घडला, गीताने इतिहास घडवला. त्यावेळी या गाण्याच्या रेकॉर्डचा खप सुमारे एक लाखापर्यंत गेला होता. ते गैरफिल्मी गीत होते, "तस्वीर तेरी दिल मेरा बहला ना सकेगी..."



अशा रीतीने तलत आमच्या आयुष्यात आला, गायला व पहिल्याच गाण्याने सर्व संगीतप्रेमींचा आवडता बनला. त्याचा आवाज या गाण्याच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर जाऊन पोहोचला. त्यानंतर तर तलत, तरुण प्रेमी जीवांचा गळ्यातील ताईत बनला. ईश्वराने ज्यांना हृदय दिले नाही त्यांच्यासाठी त्याची गाणी व गझल नव्हतीच. तो गझल देखील भावगीतासारखी गात असे. प्रसिद्ध पाकिस्तानी गझलगायक स्व. मेहंदी हसन, पाकिस्तानचा तलत मेहमूद नावाने संबोधला जाऊ लागला होता. हा तलतच्या लोकप्रियतेचा व गायकीचा सन्मान होता. ज्या मेहंदी हसनचे अनुकरण भारतातील गझलगायक स्व. जगजीतसिंग, राजेंद्र मेहता व इतर करत असत तोच मेहंदी हसन तलतजींच्या नावाने ओळखला जात होता. म्हणूनच तलत मेहमूदला शहनशाह-ए-गझल' या किताबास संगीत रसिकांनी मनापासून मान्यता दिली. त्यांच्या उर्दू गझलांनी रसिकांना पागल केले होते. तर चित्रपटगीतांनी वेड लावले होते. कारण मुळातच त्यांचा आवाज निर्मळ व मोहात पाडणारा होता.

तलतजी त्या काळातील सर्व संगीतकारांच्या म्युझिक रूममध्ये गायिले, दरवळले. अनिल विश्वास, शामसुंदर, हुस्नलाल-भगतराम, सलील चौधरी, मदन मोहन, सज्जाद, ओ. पी. नय्यर, शंकर-जयकिशन, खेमचंद प्रकाश, एस.डी. बर्मन, हंसराज बहल, ज्ञानदत्त, विनोद, गोविंदराम व इतर संगीतकारांच्या गाण्यांचे त्यांनी सोने केले.

### त्यांची काही लोकप्रिय गाणी

मिलतेही आँखे दिल हुआ दिवाना किसीका (बाबुल) । आहा रिमझिम के ये प्यारे प्यारे गीत लिये (उसने कहा था)। ये हवा ये रात ये चांदनी (संगदिल) । शामे गम की कसम (फुटपाथ) । तेरी आँखके आंसू पी जाऊ, फिर वही शाम (जहाँ आरा) / इतना ना मुझसे तू प्यार बढ़ा (छाया)। वगैरे. एकदा स्व. लतादीदींनी मदन मोहन गेल्यानंतर म्हटले होते, की तलतची सर्वोत्कृष्ट गाणी त्याने मदनभैय्याच्या संगीत दिग्दर्शनात गायिलेली आहेत. १९४० से १९८० या चार दशकांत तलतजींनी एकूण १२ भाषांमध्ये जवळजवळ ७५० गाणी म्हटली. ही सर्व गाणी आजही ऐकावीशी वाटतात. १९७१ मध्ये सं. एल. पी. कडे लतादीदींसोबत 'वो दिन याद करो' या चित्रपटात म्हटले होते. त्यांच्या संगीत कारकिर्दीतील योगदानाबद्दल भारत सरकारने १९९२ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानीत केले होते. पाश्चात्य संगीताने आक्रमण केल्याने बासरी व सतार मागे पडली तसा तलतजींचा सूरही मागे पडला. वयाच्या ७४ व्या वर्षी (९ मे १९९८) त्यांनी या जगाचा निरोप घेतला. गीतकार जो निसार अख्तर (जावेद अख्तरचे वडील) यांच्या गीतातील शब्द थोडे बदलवून तलतजींना श्रदांजली देऊया...

**"कौन कहता है तलत के हमने, तुझे भूला रखा है,
तुम्हारे गीत-गझलोंको तो हमने, कलेजेसे लगा रखा है।"**

**- शरद सोनवणे, अमळनेर.**
**मो. : 94201 08305**

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे






# अधिकमासात आईची ओटी भरण्याला महत्त्व का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अधिकमास या महिन्याला हिंदू धर्मात विशेष महत्त्व प्राप्त आहे. हा महिना भगवान विष्णू यांना समर्पित असल्याने या संपूर्ण महिन्यात धार्मिक विधी, आध्यात्मिक साधना व विष्णूंची पूजा आराधना केली जाते. तसेच अधिकमास या महिन्याला इतर अनेक बाबतींत देखील महत्त्वाचे मानले जाते. जुन्या रूढी-परंपरा या महिन्यात जपल्या जातात. अधिकमास म्हटले की डोळ्यासमोर येते जावयाचे साग्रसंगीत जेवण आणि धोंड्याचा महिना. मात्र, हा महिना केवळ जावयासाठीच विशेष नसतो तर या महिन्यात सुवासिनी मुलीने आपल्या आईची ओटी भरण्याला देखील खास कारण असते. त्यामुळे जाणून घेऊया या महिन्यात आईची ओटी का भरली जाते व त्यासाठी कोणते साहित्य आपल्याकडे असावे?

## या साहित्याशिवाय ओटी राहील अपूर्ण!

### अधिकमासात आईची ओटी का भरावी?

अधिकमास हा महिना धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. या महिन्यात दान-पुण्याला विशेष महत्त्व आहे. आईला आपण देवाच्या रूपात सदैव पुजतो तिचा आदर करतो. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' ही म्हण आपल्याकडे आहे. त्यामुळे हिंदू धर्मात आईला विशेष स्थान दिलेले आहे. आई आपल्या मुलांना जन्म देते, त्यांचे पालन पोषण करते, मुलांना वाढवते, त्यांना संस्कार देते. मूल जन्माला घालताना आईचा देखील दुसरा जन्म होतो, असे बोलले जाते. त्यामुळे आईच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी आईला दान म्हणजेच ओटी पदरात घातली जाते. यामुळे कौटुंबिक सुख आणि सौभाग्य मुलीला मिळते, असे देखील मानतात.



### ओटी भरताना कोणते साहित्य असावे?

ओटी भरताना काही गोष्टी अवश्य आपल्याजवळ ठेवाव्यात. सर्वांत आधी एक खण किंवा कोणताही ब्लाऊजपीस घ्यावा. साडी-चोळीने देखील तुम्ही ओटी भरू शकता. साडी-चोळीवर थोड्या अक्षता टाकाव्यात, त्यांना हळद-कुंकू लावावे. मग ओटीत नारळ घ्यावा, हळकुंड, खारीक, बदाम किंवा पाच प्रकारची फळे ओटीत टाकावीत. ही ओटी आईच्या पदरात घालून तिला नमस्कार करावा. ओटीतील या सर्व वस्तू सौभाग्य, मांगल्य, सुख-समृद्धीचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे ओटी भरताना या वस्तू विसरू नयेत.

# अधिकमासात ३३ दिवे लावण्यामागील रहस्य

## ३३ कोटी देवतांचा आशीर्वाद प्राप्त करण्याची साधा सुवर्णसंधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात अधिकमासाला (पुरुषोत्तम मासाला) सर्व महिन्यांमध्ये सर्वांत पवित्र मानले जाते. असे म्हटले जाते, की या महिन्यात केलेले दान किंवा पुण्यकर्म कितीही लहान असले, तरी त्यातून 'अक्षय पुण्य' प्राप्त होते. म्हणजेच असे पुण्य जे कधीही क्षीण होत नाही आणि जे शाश्वत असते. पण या महिन्यात '३३' या संख्येमागील महत्त्व तुम्हाला माहिती आहे का? चला या अधिक मासात तुम्ही तुमच्या आयुष्यातील अंधकार कसा दूर करू शकता, हे जाणून घेऊया.



### ३३ दिवे आणि ३३ कोटी देवतांचे रहस्य

पौराणिक श्रद्धांनुसार आपली संस्कृती ३३ 'कोटी' (श्रेणी किंवा कोटी) देवतांचे अस्तित्व मान्य करते. अधिक मासात 'दीपदान' करणे (दिव्यांचे अर्पण करणे) हे अंधकारावर प्रकाशाच्या विजयाचे प्रतीक मानले जाते. जेव्हा आपण ३३ वाती किंवा ३३ दिवे प्रज्वलित करतो, तेव्हा हे अर्पण थेट त्या सर्व ३३ कोटी देवतांना समर्पित केले जाते. या सर्व दैवी शक्तींचा आशीर्वाद एकाच वेळी प्राप्त करून घेण्याचे हे एक प्रतीकात्मक माध्यम ठरते.

### दीपदान कसे करावे?

यासाठी कोणत्याही भव्य तयारीची आवश्यकता नाही. खरी भक्ती ही हृदयात वसलेली असते, भौतिक संपत्तीत नव्हे. खाली दिलेल्या दोन पद्धतींपैकी जी पद्धत तुम्हाला अधिक सोयीस्कर वाटेल, ती तुम्ही निवडू शकता.

**महा-दीपक (भव्य दिवा) :** एक मोठा मातीचा दिवा घ्या आणि त्यामध्ये ३३ वाती ठेवा. त्या सर्व वाती एकाच वेळी प्रज्वलित करा. असे केल्याने अनंत आध्यात्मिक फळे प्राप्त होतात, अशी श्रद्धा आहे. **पृथक दीप (स्वतंत्र दिवे) :** जर परिस्थिती अनुकूल असेल, तर तुम्ही ३३ स्वतंत्र, लहान दिवे प्रज्वलित करण्याचा पर्यायही निवडू शकता. **तेलाची निवड :** जर तुमच्याकडे 'तूप' उपलब्ध नसेल, तर त्याबद्दल किंचितही काळजी करू नका. तुम्ही त्याऐवजी मोहरीचे तेल किंवा तिळाचे तेलही वापरू शकता. ईश्वर तुमच्या श्रद्धेकडे पाहतो, तुमच्या खिशातील संपत्तीकडे नव्हे.

### अधिकमासातील दीपदान इतके विशेष का मानले जाते?

केवळ तुमच्या घरातील देव्हाऱ्यापुरतेच मर्यादित न राहता, अधिकमासादरम्यान खालील ठिकाणी दिवे अर्पण केल्यास तुमचे भाग्य खरोखरच उजळून निघू शकते. **तुळशी पूजन :** अधिकमासादरम्यान तुळशीच्या रोपाजवळ दिवा लावणे ही एक अत्यंत महत्त्वाची धार्मिक कृती मानली जाते. या कृतीमुळे घरात नकारात्मक उर्जेचा प्रवेश रोखला जातो. **आकाश दीप :** प्राचीन काळी, लोक एका उंच बांबूच्या काठीच्या टोकावर दिवा लावून तो टांगत असत; यालाच 'आकाश दीप' म्हणून ओळखले जात असे. आपल्या पूर्वजांच्या आत्म्यांना मार्ग दाखवण्यासाठी ही प्रथा पाळली जाते. जर तुम्हाला संपूर्ण महिनाभर दररोज दिवे लावण्याचा विधी करणे शक्य झाले नसेल, तरीही तुम्ही अधिक मासातील एकादशी किंवा पौर्णिमा या दिवशी एकाच वेळी ३३ दिवे लावून संपूर्ण महिन्याचे आध्यात्मिक पुण्य प्राप्त करू शकता. **नद्या/तलाव :** वाहत्या पाण्यात दिवे अर्पण केल्याने (दीपदान केल्याने) अकाली मृत्यूची भीती नाहीशी होते, अशी श्रद्धा आहे.


### अधिकमास म्हणजे काय आणि तो का येतो?

हिंदू दिनदर्शिका चंद्राच्या गतीवर आधारित असते, तर सौर वर्ष सूर्याच्या गतीचे अनुसरण करते. चांद्र वर्ष हे सौर वर्षापेक्षा लहान असल्यामुळे, कालांतराने या दोन्हीमध्ये काही तफावत (विसंगती) निर्माण होऊ लागते. ही तफावत दूर करण्यासाठी, दर तीन वर्षांनी एक अतिरिक्त महिना, ज्याला 'अधिकमास' म्हणून ओळखले जाते, जोडला जातो. ही संकल्पना काहीशी 'लीप इयर' (अधिक वर्ष) सारखीच आहे, ज्यामध्ये दर चार वर्षांनी एक अतिरिक्त दिवस जोडला जातो.

अधिकमासाला 'मल मास' असेही का म्हटले जाते? अधिक मासाला 'मल मास' असेही संबोधले जाते; कारण या काळात अनेक शुभ समारंभ आणि विधी सहसा पार पाडले जात नाहीत. यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो. विवाह समारंभ, गृहप्रवेश समारंभ, नामकरण संस्कार, मुंज (जानवे) संस्कार या विशिष्ट महिन्यात वरील उपक्रम साधारणपणे पुढे ढकलले जातात. याच कारणामुळे या महिन्याला 'मल मास' म्हणून ओळख प्राप्त झाली. तथापि, धार्मिक दृष्टिकोनातून पाहता, हा महिना अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो.

# ग्रहदोष, ग्रहशांती, शनी दोष व साडेसातीपासून मुक्तीसाठी अत्यंत प्रभावी नवग्रह स्तोत्र!

## नित्य पठणाने कुंडलीतील सर्व ग्रहदोष होऊ लागतात ठीक



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवग्रह स्तोत्र हे महर्षी व्यास ऋषींनी रचलेले अत्यंत प्रभावी स्तोत्र आहे. या स्तोत्राच्या नित्य पठणाने कुंडलीतील सर्व ग्रहदोष ठीक होऊ लागतात, असे मानले जाते. एखादा ग्रह त्रास देत असेल तर या स्तोत्राच्या पठणाने ग्रहशांती देखील होते असे सांगितले जाते. तसेच शनी दोष किंवा साडेसातीचा त्रास सुद्धा कमी होऊ लागतो. ज्योतिषशास्त्रात ग्रहांना महत्त्व असून त्यांचे कुंडलीतील स्थान मजबूत असल्यास आयुष्यात सुख-समृद्धी येते. त्यामुळे नित्य नवग्रह स्तोत्र पठण करावे.

ज्योतिषशास्त्रात बारा राशींप्रमाणेच नऊ ग्रहांना देखील महत्त्वाचे स्थान आहे. या नऊ ग्रहांना हिंदू धर्मात देवतांचे स्वरूप मानले जाते. त्यामुळे नऊ ग्रहांची पूजा सुद्धा करतात. प्रत्येक ग्रह हा कोणत्या ना कोणत्या राशीचा स्वामी असतो. ग्रहांचे राशींवर कुंडलीतील स्थानाप्रमाणे चांगले वाईट परिणाम होतात. त्यामुळे ग्रहांचे स्थान मजबूत करण्यासाठी पूजा पाठ,मंत्र होम असे अनेक उपाय केले जातात. मात्र महर्षी व्यास ऋषींनी नवग्रहांना समर्पित स्तोत्र रचले त्याला नवग्रह स्तोत्र म्हणतात. हे स्तोत्र नित्य पठण केल्यास नवग्रहांची कृपा प्राप्त होते.

नवग्रह स्तोत्रात नऊ ग्रहांची महती वर्णन केली आहे. स्तोत्रातील पहिल्या नऊ कडव्यांमध्ये नवग्रहांचे मंत्र दिलेले आहेत आणि शेवटच्या तीन कडव्यांत या श्लोकांची फलश्रुती दिलेली आहे. हे स्तोत्र नियमित वाचल्याने आयुष्यातील अडचणी आणि संकटे दूर होऊ लागतात. तसेच मनातील भीती नष्ट होते व यशाचे मार्ग देखील खुलतात. त्यामुळे कुंडलीत ग्रहदोष असल्यास नवग्रह स्तोत्र अवश्य वाचावे.

### ॥ नवग्रहस्तोत्रम् ॥

अथ नवग्रहस्तोत्रम्। श्री गणेशाय नमः।
जपाकुसुमसङ्काशं काश्यपेयं महद्द्युतिम्।
तमोरिं सर्वपापघ्नं प्रणतोऽस्मि दिवाकरम् ॥१॥
दधिशङ्खतुषाराभं क्षीरोदार्णवसम्भवम्।
नमामि शशिनं सोमं शम्भोर्मुकुटभूषणम्॥२॥
धरणीगर्भसम्भूतं विद्युत्कान्तिसमप्रभम्।
कुमारं शक्तिहस्तं तं मङ्गलं प्रणमाम्यहम्॥३॥
प्रियङ्गुकलिकाश्यामं रूपेणाप्रतिमं बुधम्।
सौम्यं सौम्यगुणोपेतं तं बुधं प्रणमाम्यहम्॥४॥
देवानाञ्च ऋषीणां च गुरुं काञ्चनसन्निभम्।
बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम्॥५॥
हिमकुन्दमृणालाभं दैत्यानां परमं गुरुम्।
सर्वशास्त्रप्रवक्तारं भार्गवं प्रणमाम्यहम्॥६॥
नीलाञ्जनसमाभासं रविपुत्रं यमाग्रजम्।
छायामार्तण्डसम्भूतं तं नमामि शनैश्चरम्॥७॥
अर्धकायं महावीर्यं चन्द्रादित्यविमर्दनम्।
सिंहिकागर्भसम्भूतं तं राहुं प्रणमाम्यहम्॥८॥
पलाशपुष्पसङ्काशं तारकाग्रहमस्तकम्।
रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतुं प्रणमाम्यहम्॥९॥
इति श्रीव्यासमुखोग्दीतम् यः पठेत् सुसमाहितः।
दिवा वा यदि वा रात्रौ विघ्नशान्तिर्भविष्यति॥१०॥
नरनारीनृपाणां च भवेत् दुःस्वप्ननाशनम्।
ऐश्वर्यमतुलं तेषाम् आरोग्यं पुष्टिवर्धनम्॥११॥
ग्रहनक्षत्रजाः पीडास्तस्कराग्निसमुद्भवाः।
ताः सर्वाः प्रशमं यान्ति व्यासो ब्रूते न संशयः॥१२॥

॥ इति श्रीवेदव्यासविरचितम् आदित्यादिनवग्रहस्तोत्रं सम्पूर्णम्॥

## लग्न घ्या पटकन उरकून!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यंदाच्या लग्नसोहळ्यांसाठी मुहूर्तांची कमतरता जाणवू लागली आहे. अधिक मास, गुरू-शुक्र अस्त, चातुर्मास आणि सिंहस्थ कुंभमेळा या सलग धार्मिक कालखंडांमुळे पुढील काही महिने विवाहासाठी शुभ तारखा अत्यंत मर्यादित राहणार आहेत. त्यामुळे १७ मेपूर्वीच लग्न उरकण्यासाठी अनेक कुटुंबांची लगबग वाढली आहे. त्या अनुषंगाने पुरोहित मंडळींकडूनही यासंदर्भात विविध माहिती सांगितली जात आहे.

पुरोहितांच्या मते १७ मेपासून अधिक मास सुरू होत असल्याने त्या काळात कोणतीही शुभकार्ये केली जात नाहीत. त्यानंतर जुलैपासून गुरू आणि शुक्र ग्रहांचा अस्त होणार असून चातुर्मासाची सुरूवात होईल. या काळातही विवाहासारखी मंगल कार्ये वर्ज्य मानली जातात. पुढे ऑक्टोबर महिन्यात सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होत असल्याने त्याचाही परिणाम विवाह मुहूर्तांवर होणार आहे. या सर्व कारणांमुळे पुढील सुमारे आठ महिने शुभ मुहूर्तांचा तुटवडा भासणार आहे. यामुळे सध्या १७ मेपूर्वीचे मोजकेच मुहूर्त शिल्लक असल्याने विवाहेच्छुकांची धावपळ सुरू झाली आहे. कमी वेळेत तयारी पूर्ण करण्याचे आव्हान कुटुंबांसमोर उभे ठाकले आहे. वाढत्या उष्णतेमुळे सायंकाळच्या मुहूर्तांना अधिक पसंती दिली जात आहे. आता पुढील काही दिवसांतच लग्न उरकावे लागणार, अन्यथा थेट पुढील वर्षाची वाट पाहावी लागणार असल्याने विवाहेच्छुक कुटुंबांमध्ये सध्या मोठी लगबग पाहायला मिळत आहे.

# भारतातील एक अद्भुत मंदिर जेथे सायंकाळनंतर जाणे बॅन?


## दिवसाची धावपळ पण सायंकाळी पसरते भयाण शांतता, काय आहे रहस्य?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात अशी अनेक मंदिरे आहेत ज्यांचे स्वतःचे महत्त्व आहे. काही मंदिरे त्यांच्या सौंदर्यासाठी आणि भव्यतेसाठी प्रसिद्ध आहेत, तर काही मंदिरे त्यांच्या चमत्कारांसाठी आणि रहस्यांसाठी ओळखली जातात. जेव्हा रहस्यांचा विषय येतो, तेव्हा राजस्थानच्या एका मंदिराचा उल्लेख नक्कीच होतो, जेथे वास्तुकला अद्भुत आहे, कोरीव काम पाहण्यासारखे आहे. पण या सर्वांपेक्षा या मंदिराच्या रहस्यांची सर्वाधिक चर्चा होते. हे मंदिर त्याच्या शापाच्या कथेसाठी प्रसिद्ध आहे. मंदिराशी संबंधित अशी अनेक रहस्ये आहेत जी आजपर्यंत उलगडलेली नाहीत.

### कोणते आणि कुठे आहे हे रहस्यमयी मंदिर?

राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यात बाडमेर शहरापासून ३५ किलोमीटर अंतरावर असलेली किराडू मंदिरे एक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. पाच मंदिरांचा हा समूह या स्थळाचे वैशिष्ट्य आहे, की उत्तर भारतात असूनही ही मंदिरे दक्षिण भारतीय कलाशैलीत बांधलेली आहेत. ही मंदिरे खजुराहोच्या मंदिरांची आठवण करून देणाऱ्या भव्य वास्तुकलेने सुशोभित आहेत. या पाच मंदिरांपैकी मुख्य असलेले सोमेश्वर मंदिर भगवान शिवाला समर्पित आहे. एके काळी येथे नियमितपणे पूजा आणि विधी केले जात असत, परंतु आज येथे भयाण शांतता आहे आणि मंदिरातील अनेक मूर्ती तुटलेल्या आहेत. किराडू मंदिराची सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, सूर्य मावळताच येथील वातावरण गंभीर होते. दिवसाची धावपळ आणि वर्दळ लवकरच संध्याकाळच्या गहन शांततेत बदलते. संपूर्ण जागेला एक गूढ स्वरूप प्राप्त होते आणि संध्याकाळ होताच लोक येथे येणे थांबवतात.



### काय आहे नेमके रहस्य?

स्थानिक समजुतीनुसार सूर्यास्तानंतर किराडू मंदिर परिसरात थांबणे योग्य नाही. एक जुनी समजूत अशी आहे, की एका ऋषीच्या शापामुळे एक स्त्री दगडाची बनली. तेव्हापासून सायंकाळी येथे कोणीही थांबत नाही. तथापि, यामागील कथा बरीच रहस्यमय आहे. लोककथेनुसार एका ऋषीने या परिसराला शाप दिला. ऋषीने गावकऱ्यांना आपल्या शिष्याची काळजी घेण्यास सांगितले; परंतु ते निघून गेल्यावर गावकरी त्यांना पूर्णपणे विसरून गेले आणि जेव्हा शिष्याला मदतीची गरज होती, तेव्हा कोणीही आले नाही. गावकऱ्यांच्या या दुर्लक्षामुळे शिष्याचा मृत्यू झाला. जेव्हा ऋषी परत आले, तेव्हा ते खूप संतापले होते आणि रागाच्या भरात त्यांनी संपूर्ण परिसराला शाप दिला की, जो कोणी सूर्यास्तानंतर तिथे थांबेल तो दगडाचा बनेल. तेव्हापासून, लोक सूर्यास्तानंतर मंदिर परिसरात जाणे टाळतात.

किराडू मंदिराविषयी आणखी एक प्रचलित समजूत अशी आहे, की जो कोणी मंदिराची पुनर्बांधणी किंवा जीर्णोद्धार करण्याचा प्रयत्न करतो त्याला असे अडथळे येतात जे त्याला ते कार्य करण्यापासून परावृत्त करतात. लोकांचा असा विश्वास आहे की हे एका ऋषीच्या शापाच्या प्रभावामुळे घडते. काही जण तर असाही दावा करतात की रात्रीच्या वेळी विचित्र आवाज ऐकू येतात. तथापि, या मंदिरात अनेक रहस्ये दडलेली आहेत, जी अजूनही उलगडलेली नाहीत.

# भगवंतास स्मरून प्रपंच केल्यास तो होईल नीटनेटका!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नारदांनी एकदा श्रीकृष्णांना विचारले, "तुम्ही कुठे सापडाल?" त्यावर श्रीकृष्ण म्हणाले, "नारदा, मी वैकुंठात नाही, रखुमाईपाशी सापडेन असेही नाही, तर मी माझ्या भक्तांपाशी सापडेन." भक्त नाही तरी देवाशिवाय कसे राहणार ? देवाला देवपण तरी कुणी आणले ? भक्त जर नाहीत तर देव तरी कुठचे आले ? देव आहे असे जे मानतात त्यांनाच देवाचे अस्तित्व समजते. नास्तिकाला देव कुठला ? त्याला विचारले, "तुझे कोण आहे या जगात ?" तर तो सांगेल, "हे जे सर्व काही आहे आपले भाऊ, बहीण, बायको, मुले वगैरे नातेवाईक, तसेच प्रपंचात ज्या काही गोष्टी लागतात, त्या सर्व माझ्या आहेत." परंतु मग देवाघरची वाट काय ? ज्याने जग निर्माण केले त्याला विसरायचे, आणि जे उत्पन्न केले




ते माझे म्हणायचे, हा परमार्थ होईल काय ? तेव्हा 'देव आहे' अशी भावना धरा आणि देवाला दार उघडा म्हणजे तो सदासर्वकाळ तुमच्या जवळच आहे. भावनेने देव आपलासा केला पाहिजे. आपण कुठेही गेलो तरी आपल्या रामाला बरोबर घेऊन जात जा, म्हणजे तुम्हाला काही भीती नाही. 'रामाला बरोबर नेणे' हे बोलणे लोकांना चमत्कारिक वाटेल, पण ज्यांना देवच नाही असे वाटते त्यांच्याशी आपल्याला काही कर्तव्य नाही.

जो देवाच्या नादी लागला त्याचा प्रपंच बिघडला असे काहीजण म्हणतात. परंतु ज्याने प्रपंच निर्माण केला, त्याला विसरून तो प्रपंच नीट होईल का ? कधीही होणे शक्य नाही; तर त्याला स्मरूनच प्रपंच केल्याने तो नीटनेटका होईल. प्रपंच सोडून परमार्थ होणार नाही. प्रपंच करा, पण त्यातली आसक्ती सोडा म्हणजे झाले. तुम्हां सर्वांना जडभरताची गोष्ट माहीत आहेच. भरत जरी सर्व घरदार सोडून वनात गेला तरी तिथे हरिणाची आसक्ती धरलीच ! तर हरीण काय आणि माणसे काय, आसक्तीच्या दृष्टीने दोन्ही सारखीच. जोपर्यंत आसक्ती सुटली नाही तोपर्यंत परमार्थ करणे व्यर्थ होय. तरी आसक्ती सोडण्याचा प्रयत्न करा आणि माझा राम सदासर्वकाळ माझ्या मागेपुढे आहे ही भावना धरा. एकाने विचारले, "तुम्ही सर्वांना मानसपूजा करायला सांगता, पण एकटा राम सर्वांच्या जवळ कसा जाणार ?" मी त्याला सांगितले, "तू मानसपूजा कर म्हणजे तुझ्याजवळ तो राहील." तो जर सर्व ठिकाणी भरलेला आहे, तर त्याला जाणे-येणे नाहीच ! आपण मात्र त्याला पाहणे जरूर आहे. भगवंताचे नामस्मरण हा उंबरठ्यावरचा दिवा आहे. त्याने भगवंत आणि प्रपंच दोन्हीकडे उजेड पडेल. देवावर सर्व सोपवून निश्चिंत होणे हेच अनुसंधान समजावे.

# प्रपंचात परस्परांशी प्रेमभाव कसा वाढेल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



निसर्गतःच प्रेम हे प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणिमात्रांत असते. फार काय, प्रेमाशिवाय मनुष्यप्राणी जिवंत राहू शकणार नाही. प्रेमाने सर्व जग वश करून घेता येते. प्रेम ठेवण्यात पैसा खर्च होत नाही, कष्ट नाहीत. परंतु प्रत्येकाचा अनुभव पाहावा तर प्रेम करणे तितकेसे सोपे आहे असे दिसत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा, आवड निराळी आणि दैवयोगाने आलेले ऋणानुबंध निरनिराळे असतात. आपल्या विचाराचे लोक असतील त्यांच्यावर स्वाभाविकच प्रेम जडते; विरुद्ध असतील त्यांच्याबद्दल प्रेम वाटत नाही, किंबहुना द्वेषही उत्पन्न होतो. द्वेष उत्पन्न का होतो, तर आपला आणि दुसऱ्याचा विचार आणि आवड जमत नाही म्हणून. परंतु थोडा विचार केला तर असे दिसते की, आपण ज्या कारणामुळे दुसऱ्याचा द्वेष करतो, तेच कारण दुसऱ्याने आपला द्वेष करायला पुरेसे होते. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट आपल्याला न आवडली आणि तीच दुसऱ्याला आवडली, तर मला न आवडलेली गोष्ट दुसऱ्याला आवडल्यामुळे दुसऱ्याचा द्वेष करायला मला तेवढे कारण पुरेसे होते. मग त्याच न्यायाने, त्याला न आवडलेली गोष्ट मला आवडते हेच कारण त्याने माझा द्वेष करायला पुरेसे नाही का ?

'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्याचा अर्थच असा की, स्वभावाप्रमाणे प्रत्येकाची आवड ही निराळी असणारच. म्हणून द्वेषबुद्धी नाहीशी करण्याकरिता प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी सवलत ठेवणे जरूर आहे; आणि प्रेम जडण्याकरिता, सर्वांना आवडणारी जी गोष्ट असेल तिकडे लक्ष देणे जरूर आहे. प्रेम करण्याचा धडा गिरवताना सुरुवात आपल्या घरापासून करावी; घरातली माणसे, नंतर शेजारी आणि त्यानंतर आजूबाजूला आपलेपणाची भावना आपल्या कृतीने वाढवावी; म्हणजे क्रमाक्रमाने प्रेमाची वाढ होऊन सर्व वातावरण प्रेममय होऊन जाईल. सर्वांशी निष्कपट प्रेमाने वागावे; आपल्या बोलण्यामध्ये नव्हे, पाहण्यामध्येसुद्धा प्रेम असावे. आपले बोलणे अगदी गोड असावे. आपल्या अंगी सहजता यावी. घरामध्ये 'अमुक एक गोष्ट कराच' किंवा 'नकाच करू' असे हट्टाने न म्हणता आपण राहावे. जसे घडेल तसे घडू द्यावे. देह असा प्रारब्धावर टाकणे मला फार आवडते. प्रेम करायला गरिबी आड येत नाही किंवा श्रीमंती असेल तर फार द्यावे लागत नाही. जसे आई आणि मुलाचे प्रेम असते तसे भगवंताचे प्रेम लागावे. ज्याला भगवंताचे प्रेम येईल तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील. भगवंताचे प्रेम हे कोणत्याही साधनाचा प्राण आहे; ते मागण्यासाठी रोज भगवंताची प्रार्थना करावी आणि त्याच्या अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न ठेवावा.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)